ePaper

# निकालाआधीच घडामोडींना वेग; ‘मविआ’ची मुंबईत बैठक!

|| वर्ष - 8 | अंक -134 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 22 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत

- कमिन्स कसोटीत करणार विक्रम!
- पडिक्कलला शुबमनच्या जागी संधी?
- अदाणींच्या विरोधात अटक वॉरंट!
- मशिदींमध्ये वंदे मातरम गायलं गेलं पाहिजे

## आता निकालाची वाढली उत्कंठा !

# धास्ती मनात, देव पाण्यात!

## उमेदवारांचे ‘वेट अ‍ॅण्ड वॉच’, कुठे टेन्शन, कुठे रिलॅक्स

| मुंबई | महाईन्यूज

**मतदान झाल्यानंतर आता आकडेमोड सुरु झाली आहे. कोणत्या बुथवर किती मते पडली, किती आपल्याला मिळतील, किती दुसरीकडे जातील याची गणिते मांडणे सुरू झाले आहे. विधानसभा निवडणुकीसाठीचे मतदान संपले. आता आकडेमोड सुरू झाली आहे. कोणत्या बुथवर किती मते पडली, किती आपल्याला मिळतील, किती दुसरीकडे जातील याची गणिते मांडणे सुरू झाले आहे. कुणी विजयाची आकडेमोड करीत आहेत तर कुणी मताधिक्याची. धास्ती सगळ्यांच्याच मनात आहे. उमेदवार देव पाण्यात ठेवून बसले आहेत.**




### निवडणुकीची घोषणा होताच उमेदवार कामाला लागले

विधानसभा निवडणुकीची घोषणा होताच प्रबळ दावेदार व इच्छुक पूर्ण शक्तीनिशी कामाला लागले. श्वास घेण्याची उसंत नामांकन अर्जापर्यंत मिळाली नाही. मैदानात उतरणाऱ्यांना उमेदवारीसाठी मोर्चेबांधणी करावी लागली. प्रमुख नेत्यांना आधी जागा मिळवणे व नंतर उमेदवार निश्चित होताच, असंतुष्टांची मनधरणी करावी लागली.

### पदयात्रा, मिरवणुका, सभांचे सत्र

निवडणुकीचा प्रत्यक्ष प्रचार सुरू होताच भल्या सकाळी ७ वाजतापासून रात्री १० वाजेपर्यंत सुरू झाले. यानंतर रात्री एक-दीड वाजेपर्यंत भेटी, संवाद आणि सेटिंग चालले. ही दिनचर्या मतदान संपल्यानंतरही आकडेमोड करण्यात गेली.

### किती मतदान, कुणी काम केलं कुणी नाही, कुणाकडून दगाफटका, आढावा घेणं सुरु

कुठल्या बुथ किती मतदान झाले, कुणी काम केले नाही, कुणी दगा दिला, फटका कुठे बसला याचा अंदाज पोल मॅनेजर्सनी रात्रीच घेतला. काही उमेदवारांनीही स्थिती जाणून घेतली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २५-३० मतदारसंघाची लगेच माहिती घेतली.

### सत्तास्थापनेची पूर्वतयारी सुरु, उमेदवारांचे ‘वेट अ‍ॅण्ड वॉच’

निवडणुकीत उमेदवार असणारे देवेंद्र फडणवीस, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासारख्या नेत्यांना स्वत:चा मतदारसंघ सांभाळताना निवडणूक रणनीती व मित्रपक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करावा लागला. आता ही नेतेमंडळी सत्तास्थापनेच्या पूर्वतयारीला लागली आहे. उमेदवारांचे ‘वेट अ‍ॅण्ड वॉच’, कुठे टेन्शन तर, कुठे रिलॅक्स अशी स्थिती आहे. महाराष्ट्र विधानसभेसाठी बुधवारी (२० नोव्हेंबर) मतदान पार पडलं. आता शनिवारी (२३ नोव्हेंबर) या निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाईल. महाराष्ट्रासह देशभरातील लोकांचं या निकालाकडे लक्ष लागलं आहे. तत्पूर्वी निवडणूक निकालाचे एक्झिट पोलदेखील समोर आले आहेत. या पोल्सनुसार महायुतीचं पारडं जड दिसत आहे. मात्र, २०१९ च्या निवडणुकीत जवळपास सर्वच एक्झिट पोल चुकीचे ठरले होते. त्यामुळे यंदा काय निकाल लागतो याबाबत लोकांची उत्सुकता वाढली आहे. दरम्यान, महायुतीमधील सर्वच नेत्यांनी दावा केला आहे की राज्यात आम्हालाच बहुमत मिळेल आणि आम्ही लवकरच राज्यात सरकार स्थापन करू. मात्र, राज्यात महायुतीचं सरकार आल्यास मुख्यमंत्री कोण होणार हा प्रश्न उपस्थित केला जात आहे? त्यावर महायुतीमधील नेत्यांनी वेगवेगळ्या नेत्यांची नावं घेतली आहेत.

### मतदान संपताच अपक्षांचा भाव वधारला

महाराष्ट्र विधानसभेसाठी बुधवारी (२० नोव्हेंबर) मतदान पार पडले. १५८ राजकीय पक्ष आणि अपक्ष असे मिळून २८८ विधानसभा मतदारसंघांत एकूण ४,१३६ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. मात्र, खरी लढत ही महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच आहे. दोन्ही आघाड्यांमध्ये प्रत्येकी तीन प्रमुख घटक पक्ष आहेत. दरम्यान, या निवडणुकीच्या निकालानंतर सरकार कुणाचं येईल हे ओघाने समोर येईलच. तत्पूर्वी मतदानानंतर निवडणुकीच्या निकालाबाबतचे एक्झिट पोल जाहीर झाले आहेत. राज्यात जे १० प्रमुख एक्झिट पोल जाहीर झाले त्यापैकी सहा पोल्समध्ये राज्यात महायुतीला बहुमत मिळेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर तीन पोल्समध्ये महाविकास आघाडीला सत्ता मिळेल असा दावा करण्यात आला आहे. एका पोलनुसार राज्यात त्रिशंकू स्थिती निर्माण होऊ शकते. दरम्यान, या एक्झिट पोल्सवर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. तसेच बहुमताच्या जवळपास पोहोचल्यास सत्ता कशी मिळवता येईल याबाबत सर्वच पक्षांनी चाचपणी सुरू केली आहे.

# अजित पवार हाजीर हो...!

## बारामती कोर्टाकडून उमुख्यमंत्री अजित पवारांना समन्स

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उमुख्यमंत्री अजित पवार यांना 2014 च्या निवडणुकांमध्ये केलेल्या एका वक्तव्यामुळे बारामतीच्या कोर्टाकडून समन्स बजावण्यात आलं आहे. याचिकाकर्ते सुरेश खोपडे यांनी या संदर्भात माहिती दिली आहे. अजित पवारांनी 2014 च्या लोकसभा निवडणुकांमध्ये उमेदवाराला मतदान केलं नाही तर गावचं पाणी बंद करु असं वक्तव्य केलं होतं.**



माजि आयपीएस अधिकारी सुरेश खोपडे यांनी अजित पवारांच्या याच वाक्याविरोधात याचिका दाखल केली आहे. सुरेश खोपडे हे 2014 मध्ये आप पक्षाचे उमेदवार होते. त्यावेळी देखील त्यांनी यासंदर्भात तक्रार केली होती. त्यानुसार बारामती कोर्टाने अजित पवारांना हे समन्स बजावलं आहे. तसेच 16 नोव्हेंबर रोजी कोर्टात हजर राहण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. याचिकाकर्ते सुरेश खोपडे यांनी एबीपी माझासोबत संवाद साधताना यासंदर्भात माहिती दिली आहे. अजित पवार यांनी 2014च्या लोकसभा निवडणुकांसाठी प्रचार करताना गावकऱ्यांना ही दमदाटी केल्याची माहिती आहे. बारामतीमधील मासाळवाडी या गावमध्ये अजित पवारांनी सुप्रिया सुळेंना मतदान करण्यासाठी दौरा केला होता. त्याचवेळी या गावात पाणीटंचाई भीषण प्रश्न होता. तेव्हा 'सुप्रिया सुळे यांना मतदान केलं नाही तर गावचं पाणी बंद करु. तुमचा दोन महिन्यात पाणीप्रश्न सोडवतो.. आम्हालाच मतदान करा... अशी दमदाटी अजित पवारांनी बारामतीमधील गावकऱ्यांना केल्याचा आरोप आहे. ज्या सुप्रिया सुळेंसाठी अजित पवारांनी हे वक्तव्य केलं होतं, त्याच सुप्रिया सुळे यंदाच्या निवडणुकीत अजित दादांच्या विरोधात आहे. त्यामुळे निवडणुकीची धामधूम संपल्यानंतर अजित पवार हे नियोजित तारखेला कोर्टात हजर राहणार की नाही याकडे लक्ष लागून राहिलं आहे. अवघ्या काही तासांमध्ये राज्याच्या राजकारणाचा निकाल लागणार आहे. मागच्या अडीच वर्षांमध्ये राज्याच्या राजकीय परिस्थितीवर बरीच बदलली आहे. राजकारणात सुरु असलेला सावळा गोंधळ हा मतदारांच्या काही पचनी पडत नसल्याचं चित्र आहे. त्यामुळे 2024ची विधानसभा निवडणुक ही प्रत्येकासाठीच महत्त्वाची आहे. त्यातच जशी ही राजकीय लढाई आहे तशीच यंदा ही नात्यांचीही लढाई झालीये. ज्या सुप्रिया सुळेंसाठी अजित पवारांनी हे वक्तव्य केलं होतं, त्याच सुप्रिया सुळे यंदाच्या निवडणुकीत अजित दादांच्या विरोधात आहे. त्यामुळे निवडणुकीची धामधूम संपल्यानंतर अजित पवार हे नियोजित तारखेला कोर्टात हजर राहणार की नाही याकडे लक्ष लागून राहिलं आहे.

### नेमकं प्रकरण काय?


२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत बारामती तालुक्यातील मतदारांना अजित पवार यांनी धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला होता. निवडणूक प्रचार संपल्यानंतरही अजित पवार हे मासाळवाडी या गावामध्ये गेले होते. त्यावेळी गावातील लोकांनी पाणीटंचाईचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर अजित पवार यांनी सुप्रिया सुळे यांना मतदान केले नाही तर गावचे पाणी बंद करु, असा इशारा दिला होता. तुमचा पाणी प्रश्न दोन महिन्यांत सोडवतो, परंतु मतदान आम्हालाच करा, असेही अजित पवार यांनी म्हटले होते.

# दहावीत उत्तीर्ण होण्यासाठी किती गुण आवश्यक?

## विज्ञान विषयांसाठी उत्तीर्णतेचे निकष प्रचलित नियमांप्रमाणेच असणार

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतल्या जाणाऱ्या दहावीच्या परीक्षेत गणित आणि विज्ञान या विषयांसाठी उत्तीर्णतेचे निकष प्रचलित नियमांप्रमाणेच असणार आहेत.**



ज्या वर्षी निकषांत बदल होतील, त्या वर्षी मंडळाकडून स्वतंत्ररित्या कळवण्यात येईल, असे स्पष्टीकरण राज्य मंडळाने दिले आहे. राज्य मंडळाकडून घेतल्या जाणाऱ्या दहावीच्या परीक्षेत गणित आणि विज्ञान या विषयांत उत्तीर्ण होण्यासाठी ३५ गुण मिळवावे लागतात. मात्र, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची शालेय स्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात या नियमात बदल प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यानुसार दहावीच्या परीक्षेत गणित आणि विज्ञान या विषयात ३५ गुणांपेक्षा कमी आणि २० गुणांपेक्षा अधिक गुण असल्यास अकरावीला प्रवेश घेता येणार असल्याचे आराखड्यात प्रस्तावित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दहावीच्या परीक्षेत गणित आणि विज्ञान विषयांत उत्तीर्णतेच्या निकषात बदल करण्यात आला नसून, प्रचलित निकषच लागू असल्याचे स्पष्ट केले आहे.राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, की राज्य अभ्यासक्रम आराखड्यातील तरतूद केवळ प्रस्तावित आहे.त्याबाबत निर्णय झालेला नाही. मात्र, या बाबत पालक, विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम असल्याचे निदर्शनास आल्याने राज्य मंडळाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. येत्या परीक्षेसाठी प्रचलित नियमात कोणताही बदल केलेला नाही. कोणताही बदल करायचा असल्यास त्यापूर्वी शासन मान्यता, शासन निर्णय अशा प्रक्रिया असते. राज्य शैक्षणिक, संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी तिसरी ते बारावी या स्तरासाठीचा राज्य अभ्यासक्रम आराखड्याचा अंतिम मसुदा जाहीर केला.

### बदल मंडळाकडून कळवण्यात येईल

या मसुद्याला राज्य सुकाणू समितीने मान्यता दिली आहे. या आराखड्यानुसार शालेय शिक्षणाच्या स्तरावर अनेक बदल प्रस्तावित करण्यात आले आहेत. आता राज्यात नवीन सरकार अस्तित्त्वात आल्यावर राज्य अभ्यासक्रम आराखड्याची पुढील प्रक्रिया राबवली जाणार आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतल्या जाणाऱ्या दहावीच्या परीक्षेत गणित आणि विज्ञान या विषयांसाठी उत्तीर्णतेचे निकष प्रचलित नियमांप्रमाणेच असणार आहेत. ज्या वर्षी निकषांत बदल होतील, त्या वर्षी मंडळाकडून स्वतंत्ररित्या कळवण्यात येईल, असे स्पष्टीकरण राज्य मंडळाने दिले आहे.

# वीज तोडल्याने पाण्याअभावी झाडांची हानी!

## मेट्रो इको पार्कने थकीत बिल न भरल्याने महावितरणची कारवाई

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मेट्रो इको पार्कमधील झाडांच्या जीवितास पुन्हा एकदा धोका निर्माण झाला आहे. गेल्या वर्षी येथील दुर्मिळ प्रजातींची १४० झाडे पाण्याअभावी मृत झाली होती. त्यानंतर आता वीजबिल थकीत असल्याने महावितरणने येथील वीज तोडली आहे. पार्कमध्ये वीजच नसल्याने पाण्याचा उपसा करणे शक्य होत नसून, पाणी न मिळाल्याने झाडे जळण्याची भीती पर्यावरणप्रेमी व्यक्त करत आहेत.**



### महावितरणची कारवाई

पर्यावरणप्रेमींनी दिलेल्या माहितीनुसार, मेट्रो इको पार्कचे वीजबिल गेल्यावर्षीपासून थकीत आहे. जवळपास १३ हजार ९२० रुपयांचे हे बिल सप्टेंबरपासून थकीत असल्याने महावितरणने गेल्या आठवड्यात ही कारवाई केली. मात्र, या कारवाईमुळे येथील पाणी उपसा बंद झाल्याने येथील झाडांना पाणी देणे अशक्यप्राय झाले आहे. त्यामुळे येथील झाडांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

### पाण्याची सोय काय

मेट्रो इको पार्कमध्ये एक कूपनलिका आणि पाण्याची टाकी आहे. त्यातून मोटारीद्वारे पाण्याचा उपसा करून हे पाणी झाडांना दिले जाते. कूपनलिकेचे पाणी आटल्यावर बाहेरून टँकर मागवले जातात. मात्र, या पूर्ण पार्कमध्ये महापालिकेचा पाण्याचा नळजोड नाही. गेल्या आठवडाभरातच पाण्याअभावी ही झाडे सुकलेली आहेत. त्यामुळे पाणी देण्यासाठी वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत होणे अत्यावश्यक आहे, असे पर्यावरणप्रेमी नागरिकांनी सांगितले.

### झाडांकडे दुर्लक्ष

मेट्रोच्या मार्गिकेसाठी अनेक झाडांची तोड करण्यात आली. त्याबदल्यात मेट्रोला रावेत येथील पाच एकराचा भूखंड मेट्रो इको पार्क उभारण्यासाठी देण्यात आला. मेट्रोने या भूखंडावर जवळपास एक हजार झाडे लावली. ही जागा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणूक आयोगाकडे हस्तांतरित झाली. या जागेवर सध्या निवडणूक आयोगाच्या गोदामाचे काम सुरु असल्याने ही जागा बांधकाम विभागाकडे आहे. त्यामुळे त्यांनी या पार्कची देखरेख करणे आवश्यक आहे.

### हरित न्यायालयाकडून इशारा

गेल्या वर्षी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे येथील १४० झाडे मृत घोषित करण्यात आली होती. या भूखंडावरील झाडांचे अस्तित्व अबाधित राहावे, हे पार्क खुले केले जावे, यासाठी काही पर्यावरणप्रेमींनी जनहित याचिका दाखल केली होती. त्यानंतर हरित लवादाने येथील झाडांची काळजी घेण्याबाबत प्रशासनाला खडे बोल सुनावले होते. मात्र, तरीही प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे येथील झाडांना पुन्हा धोका निर्माण झाला आहे.

> “मेट्रो इको पार्कमधील झाडांची काळजी घेणे हे सर्वस्वी जिल्हाधिकारी कार्यालयाचे काम आहे. मात्र, याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. याआधीही प्रशासनाच्या उदासीनतेमुळे येथील झाडांचा बळी गेला आहे. याबाबत हरित न्यायालयानेही या झाडांची काळजी घेण्याबाबत प्रशासनाला आदेश दिले होते.
> - प्रशांत राऊळ, पर्यावरणप्रेमी

> “मेट्रो इको पार्क हे गेल्या वर्षभरापासून नागरिकांसाठी बंद ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे आतील झाडांची कशी निगा राखली जाते, याबाबत आम्ही अनभिज्ञ आहोत. या मेट्रो इको पार्कमधील झाडांचे कोणतेही नुकसान केले जाणार नाही; असे आश्वासन जिल्हाधिकारी प्रशासनाने दिले होते. मात्र तसे होताना दिसत नाही.
> - विकास बडोलिया, पर्यावरणप्रेमी

> ‘मेट्रो इको पार्कमधील वीजजोड हा मेट्रोच्या नावाने असल्याने आम्हाला वीजबिल आले नाही. तसेच महावितरणची नोटीसही आलेली नाही. ही जागा आता निवडणूक आयोगाच्या अंतर्गत असल्याने लवकरच त्या नावे हा मीटर केला जाईल. एक- दोन दिवसांमध्ये वीजबिल भरून वीजपुरवठा पूर्ववत केला जाईल.’
> -अनिल मलशेट्टी, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

> “मेट्रो इको पार्कची महावितरणकडे नोंद ज्या मोबाईल नंबरवर आहे. त्यानंबरवर बिल भरण्यासाठी आम्ही नोटीस पाठवली होती. मात्र, तरीही भरणा करण्यात न आल्याने आम्हाला ४-५ दिवसांपूर्वी वीज तोडावी लागली.’
> -अतुल देवकर, कार्यकारी अभियंता, महावितरण भोसरी विभाग

---

# ‘अपार आयडी’ नोंदणीबाबत शाळांची अनास्था’

## पिंपरी-चिंचवड शहरात फक्त 14 टक्के शाळांनी केलीय ‘अपार कार्ड’ नोंद

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**‘अपार आयडी’ तयार करण्याबाबतच्या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना शिक्षण विभागाने सूचना दिल्या आहेत. मात्र, अद्याप बहुतांश शाळांनी विद्यार्थ्यांचे ‘अपार आयडी’ काढण्याची प्रक्रिया सुरू देखील केली नसल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. पिंपरी-चिंचवड शहरात फक्त १४ टक्के शाळांनी ‘अपार कार्ड’ची नोंदणी केल्याची माहिती आहे. प्रत्येक शाळांनी तात्काळ ‘अपार आयडी’ काढण्याच्या सूचना शिक्षण विभागाने शाळांना दिल्या आहेत.**




राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० अंतर्गत देशाच्या शैक्षणिक पद्धतीत एकूणच आमूलाग्र बदल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. अभ्यासक्रमापासून ते कार्यपद्धतीपर्यंतच्या बदलापर्यंतचा हा मोठाच पट आहे. त्यातीलच ‘अपार’ हा एक उपक्रम कार्यान्वित झाला आहे. याद्वारे देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचा स्वतंत्र ओळख क्रमांक आणि सोबतच डिजीलॉकरची सोय उपलब्ध करून दिली जात आहे. ‘एक देश, एक विद्यार्थी ओळख’ या संकल्पनेच्या अंतर्गत हा उपक्रम आहे. त्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरात फक्त १४ टक्के खासगी शाळा; तर महापालिकेच्या माध्यमिक विभागाच्या इयत्ता नववी ते दहावीच्या मुलांच्या १०० नोंदणी केली आहे.

### माहितीच्या खातरजमामुळे उशीर

‘अपार’ ओळख क्रमांकासाठी शाळांनी पालकांशी संपर्क साधायचा आहे. पालकांनीही याबाबत जागरूक असण्याची अपेक्षा आहे. ‘अपार’साठी यू-डायस नोंदणी क्रमांक, जन्मतारीख, लिंग, मोबाइल क्रमांक, आई- वडिलांचे नाव, आधारकार्डवरील नाव, आधार क्रमांक हा तपशील अत्यावश्यक आहे. अनेक वेळा विद्यार्थ्यांचे ‘यू-डायस’ आणि आधार कार्डवरील नावात बदल दिसून येत आहे. विद्यार्थी हा अठरा वर्षांखालील असेल; तर या प्रक्रियेसाठी पालकांची लेखी संमती अत्यावश्यक आहे. या सगळ्या माहितीची शाळांना खातरजमा करायची असल्याने उशीर होत असल्याचे शाळांनी सांगितले.

> ‘अपार आयडी’ साठी नोंदणी करण्यासाठी विद्यार्थ्यांकडे वैध आधार कार्ड असणे आवश्यक आहे. पालकांची संमती प्राप्त केल्यानंतर, शाळा ‘अपार’ ओळखपत्र तयार करण्यासाठी पुढे जाऊ शकतात. पालकांनी सहकार्य केले पाहिजे.
> - संगीता बांगर, प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग.



## भूमिका

# कोणाचे फटाके, कोणाचे दिवाळे?

**विधानसभेसाठीची निवडणूक अखेर पार पडली. आता प्रतीक्षा आहे शनिवारी जाहीर होणाNया निकालांची. शनिवारी कोण फटाके फोडतो आणि कोणाचे दिवाळे निघते हे दिसेलच.**

विधानसभेसाठीची निवडणूक अखेर पार पडली. आता प्रतीक्षा आहे शनिवारी जाहीर होणाNया निकालांची. शनिवारी कोण फटाके फोडतो आणि कोणाचे दिवाळे निघते हे दिसेलच. गेल्या पाच वर्षात महाराष्ट्रातील जनतेने तीन मुख्यमंत्री व त्यांची तीन सरकारे अनुभवली. गेल्यावेळी मतदान केले कोणाला व सरकार कोणी बनविले असा प्रश्न राज्यातील जनतेला पडला होता आणि आताही तीच परिस्थिती आहे. विशेष म्हणजे राज्यातील सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी गेल्या पाच वर्षांत सत्ता उपभोगली. महायुती विरुद्ध महाआघाडी असा मोठा रणसंग्राम यंदाच्या विधानसभा निवडणुकीत दिसला असला तरी निवडून आल्यानंतर आपला आमदार त्याच पक्षात पाच वर्षे राहील याची मतदारांना शाश्वती नाही. उमेदवार आपल्याला मते द्या, असे आवाहन करताना आपण निवडून आल्यावर पक्ष सोडणार नाही असे कोणी ठामपणे सांगत नाही. महाराष्ट्रात भाजपा, शिवसेना शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार अशा तीन पक्षांचे महायुतीचे सरकार आहे. महायुतीकडे दोनशेपेक्षा जास्त आमदार आहेत.



याच पक्षाचे केंद्रात सरकार आहे. तरीही तब्बल ४६ हजार कोटींची तरतूद करून राज्यातील अडीच कोटी बहिणींसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या सरकारला राबवावी लागली व मतदानापूर्वीच म्हणजे नोव्हेंबरचा १५०० रुपयांचा हप्ता आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच या सरकारने बहिणींच्या बँक खात्यात जमा केला. एवढी तप्तरता सरकार अन्य कामात कधी तरी दाखवते का? लाडकी बहीण योजनेवरून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांमध्ये श्रेयवादाचा संघर्ष कसा चालू होता, याचाही अनुभव आला. यंदा बंडोबांचे पीक मोठे होते. बंडखोरांची समजूत घालण्यासाठी भाजपा व शिवसेनेला कशी कसरत करावी लागते आहे हे महाराष्ट्रातील जनतेने पाहिले आहे. सत्तेसाठी वाट्टेल ते हा एकच मंत्र सध्या राबविला जातो आहे. ठाकरेंची शिवसेना व शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन मोठे प्रादेशिक पक्ष फोडल्यानंतरही महायुतीला साम-दाम-दंड-भेद अशा सर्व उपायांचा अवलंब या निवडणुकीत करावा लागला आहे. कारण यंदाची विधानसभा निवडणूक चार नव्हे तर सहा पक्षांच्या दृष्टीने अत्यंत प्रतिष्ठेची आहे. उद्धव ठाकरे विरुद्ध एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री विरुद्ध मुख्यमंत्री, शिवसेना विरुद्ध शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार विरुद्ध अजित पवार, भाजपा विरुद्ध काँग्रेस असे अनेक कंगोरे या निवडणुकीला आहेत. सन २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा भाजपाची सत्ता येणार तीही मनसेच्या साथीने, सत्तेत मनसे असणार अशी भविष्यवाणी मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केली आहे. निवडणुकीनंतर महायुतीला बहुमत मिळाले, तर एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री असतील का, नव्या सरकारमध्ये पुन्हा हेच दोन उपमुख्यमंत्री असतील का, महायुतीचे सरकार आले तर मनसे हा युतीत चौथा मित्रपक्ष असणार का, महायुतीच्या सरकारमध्ये अमित ठाकरे हे मंत्री असतील का, या सर्व प्रश्नांची उत्तरे २३ नोव्हेंबर रोजी होणाNया मतमोजणीनंतर मिळणार आहेत. शरद पवारांनी सांगितल्यानुसार ज्याचे सर्वात जास्त आमदार त्या पक्षाचा मुख्यमंत्री असेल. लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात महाआघाडीतील पक्ष फुरफूरत होते. पण हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजपाला मोठे टॉनिकच मिळाले. लोकसभा निवडणुकीला चार महिने झाले. या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. तेव्हा भाजपा विरोधातला राग मतदारांनी काढला होता. गेल्या चार महिन्यांत जनतेच्या मनातील भाजपा विरोधाची धार बरीच सौम्य झाली आहे. महायुतीने आपला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर केलेला नाही. महाआघाडीने मुख्यमंत्रीपदाचा चेहरा निवडणुकीच्या अगोदर जाहीर करावा म्हणून ठाकरे किती घाई करीत होते, हे जनतेने पाहिले आहे. महायुती व महाआघाडी अशा दोन मोठ्या आघाड्या एकमेकांच्या विरोधात दंड थोपटून आव्हान देत असल्या तरी दोघांकडेही नेतृत्व कोणी करावे यावर मतैक्य नाही.

## प्रासंगिक »

### जरा हवा येऊ द्या!

***राजधानी दिल्लीच प्रदूषित असलेल्या आपल्या देशात जगातील १०० अतिप्रदूषित शहरांपैकी ३९; शिवाय एकंदर हवेच्या दर्जाहीनतेतही आपलाच क्रमांक पहिला...***

राजधानी दिल्लीतील हवेतच प्रदूषण आहे. आधीच त्या शहरातील हवा भिकार. अलीकडच्या काळात तर ती अधिकाधिक भिकार होऊ लागली आहे, हे कोणी अमान्य करणार नाही. दिल्लीचे वातावरण कधीपासून नक्की खराब होऊ लागले याबाबत अनेकांची मते वेगवेगळी असतील. ती दूर ठेवून राजधानीतील हवेच्या घसरत्या दर्जाचा विचार व्हायला हवा. लवकरच महासत्ता वगैरे होऊ घातलेल्या देशाची राजधानी दिल्ली हे आपल्या देशातील बिघडत चाललेल्या वातावरणाचे एक ढळढळीत प्रतीक. भर दिवसा वातावरणात काळोख दाटवणारी हवा दिल्लीची आणि धडधाकटाचा श्वास कोंडवणारी हवाही दिल्लीचीच. या राजधानीस ना स्वत:चा चेहरा आहे ना स्वत:चे पर्यावरण. शेजारील पंजाब, हरयाणा, उत्तर प्रदेश या राज्यांत काही घडले की दिल्लीचा चेहरा बदलतो.

गेल्या २४ वर्षांत सात मुख्यमंत्री अनुभवणाऱ्या झारखंडची यंदाची निवडणूक राज्यापेक्षा बाहेरचे मुद्दे प्रचारात आणल्याने गाजली असे म्हणावे लागेल. केवळ केंद्रातील सत्ताधाऱ्यांची सोय म्हणून महाराष्ट्रात जसे एकाच टप्प्यात मतदान घेतले गेले त्याच्या अगदी विपरीत झारखंडमध्ये घडले.

# झारखंडी राजकारणास भाजपची ‘कलाटणी’

विधानसभेच्या केवळ ८१ जागा असलेल्या या राज्यात बुधवारी दुसऱ्या टप्प्यात ३८ जागांवर मतदान झाले. यात सरशी कुणाची होईल हे येत्या २३ तारखेला कळेल. पण मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची तुरुंगवारी, त्यांचे सरकार पाडण्यासाठी गेली पाच वर्षे सतत सुरू असलेले प्रयत्न, यात भाजपचा लपून न राहिलेला सहभाग आणि या पार्श्वभूमीवर प्रचारात आणले गेलेले मुद्दे याचा परामर्श घेणे गरजेचे ठरते. सोरेन यांना भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून जेरीस आणण्याचे प्रयत्न कमी पडू लागल्याचे लक्षात आल्यावर भाजपने बांगलादेशींची घुसखोरी हा नवाच मुद्दा प्रचारात आणला. मुळात या राज्याची सीमा कोणत्याही देशाला लागून नाही. हा मुद्दा प्रभावी ठरेल असे आसामसुद्धा या राज्यापासून बरेच दूर. झारखंड आदिवासीबहुल; मुस्लिमांची लोकसंख्याही लक्षणीय ठरावी अशी नाही. घुसखोरांनी या राज्यात मोठ्या प्रमाणावर आश्रय घेतला अशी अधिकृत आकडेवारी केंद्रीय गृहमंत्रालयाने कधी



जाहीर केली नाही. तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा हा मुद्दा पुढे रेटत राहिले; हे अतर्क्यच. ‘नरेंद्र मोदींनी घुसखोरी पूर्णपणे थांबवली’ अशा आशयाचे विधान अमित शहांनी २०२३ मध्ये मध्य प्रदेशच्या निवडणुकीत केले होते. त्याचाच हवाला देत हेमंत सोरेन यांनी हा मुद्दा निष्प्रभ करण्याचा प्रयत्न केला असला तरी राज्यांच्या निवडणुकीत स्थानिक प्रश्नांऐवजी असे मुद्दे रेटण्यामागील भाजपची नेमकी भूमिका काय? की हे, गैरलागू मुद्द्यावरून प्रचाराचा धुरळा उडवून देत विरोधकांना त्यात अडकवून ठेवण्याचे धोरण?या राज्यात नक्षलवादाने वर्षानुवर्षे ठाण मांडले आहे. ही समस्या सोडवण्याची जबाबदारी जेवढी राज्याची तेवढीच केंद्राची. यावर केंद्राची कामगिरी प्रभावी म्हणावी अशी नाहीच. या पार्श्वभूमीवर राज्य ताब्यात द्या, ही समस्या आम्ही पूर्णपणे निकालात काढू असा प्रचार अधिक सयुक्तिक ठरला असता पण भाजपने ते टाळले. का याचे उत्तर घोषणा व अंमलबजावणी यातील फरकात दडले आहे. खाण घोटाळ्याचा आरोप करून केंद्रीय यंत्रणांच्या मदतीने सोरेन यांना तुरुंगात डांबण्यात आले. उच्च न्यायालयाने त्यांची जामिनावर सुटका करताना या आरोपात अजिबात तथ्य नाही असा स्पष्ट निर्णय दिला. ते पुन्हा मुख्यमंत्री होताच त्यांचे पूर्वसुरी चंपाई सोरेनना पक्षात घेण्याची किमया भाजपने करून दाखवली. ऐन प्रचाराच्या काळात सोरेन यांच्या निकटवर्तीयांवर ईडीच्या ‘धाडसत्रा’चा प्रयोग करण्यात आला. झारखंड मुक्ती मोर्चा व काँग्रेसचे सरकार भ्रष्ट आहे असा संदेश मग भ्रष्टाचाराचे अनेक आरोप असलेले माजी मुख्यमंत्री मधू कोडा भाजपवासी कसे? कोडांच्या पत्नीस भाजपची उमेदवारी कशी?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गौतम अदाणी यांनी देशाला डाग लावलाय!

## महाराष्ट्राला अदाणीराष्ट्र बनवणार नाही : संजय राऊत

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी यांच्यावर दोन हजार कोटी रुपयांची लाच दिल्याचा आरोप अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील सरकारी वकिलांनी केला. यानंतर याचे पडसाद भारतीय शेअर बाजारात उमटले असून शेअर बाजाराचे निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये मोठी घसरण पाहायला मिळत आहे. तसेच अदाणी समूहाच्या शेअरमध्ये जवळपास २० टक्क्यांची घसरण झालेली पाहायला मिळत आहे. गौतम अदाणी आणि त्यांचा पुतण्या सागर अदाणी यांच्यासह इतर सात जणांनी सौर ऊर्जा वितरीत करण्याचे कंत्राट मिळविण्यासाठी भारतातील सरकारी अधिकाऱ्यांना २,०२९ कोटी रुपयांची (२६५ दशलक्ष डॉलर्स) लाच देऊ केली. ज्यामुळे अमेरिकेतील गुंतवणूकदारांचे नुकसान झाले, असा आरोप त्यांच्यावर ठेवला गेला आहे. पहाटे आलेल्या या बातमीचे पडसाद बाजार उघडताच त्यावर दिसून आले.**



अदाणी एंटरप्राईजेसच्या शेअरमध्ये २० टक्क्यांची घसरण दिसली. तर अदाणी एनर्जी सोल्यूशनही लाल रंगात रंगले. अदाणी ग्रीन एनर्जी कंपनीला कंत्राट मिळविण्याबद्दल लाच दिल्याचा आरोप ठेवला गेला. या कंपनीच्या शेअरमध्ये १९.१७ टक्क्यांची घसरण झालेली पाहायला मिळाली. अदाणी टोटल गॅस १८.१४ टक्के, अदाणी पॉवर १७.७९ टक्के आणि अदाणी पोर्ट्समध्ये १५ टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली.याशिवाय भारताच्या सरकारी अधिकाऱ्यांना दोन हजार कोटी रुपयांपेक्षा अधिकची लाच देणे, गुंतवणूकदार आणि बँकाँशी खोटे बोलणे आणि अब्जावधी रुपये त्यातून गोळा केल्याचा आरोप अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील सरकारी वकिलांनी भारतातील प्रसिद्ध उद्योगपती गौतम अदाणी यांच्यावर केला आहे. दरम्यान, याप्रकरणी संजय राऊतांनी गौतम अदाणींवर आणि सत्ताधारी पक्षावर टीका केली. आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधला."अमेरिकेत अदाणींविरोधात अटक वॉरंट निघालंय. ट्रम्प यांनी सुत्र हाती घेतल्यानंतर अदाणींविरोधात वॉरंट काढलं.महाराष्ट्रातील अनेक टेंडर्सही गौतम अदाणींनी बळकावण्याचा प्रयत्न केला, असं संजय राऊत म्हणाले.संजय राऊत पुढे म्हणाले, "ट्रम्प प्रशासनाने अदाणींविरोधात अटक वॉरंट काढलंय. हे देश, मोदी आणि पूर्ण भाजपासाठी शरमेची गोष्ट आहे. अदाणीमुळे या देशाला एक डाग लावलाय. म्हणून महाराष्ट्राला अदाणीराष्ट्र बनवणार नाही.""धारावी ते एअरपोर्टपर्यंत सर्व अदाणींना विकलं. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार, नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी निवडणुकीत २ हजार कोटींहून अधिक पैसा खर्च केलाय. हा भ्रष्टाचार आहे, ही लाच आहे. त्यासाठीच ट्रम्प सरकारने त्यांच्याविरोधात अटक वॉरंट काढलं आहे. ही देशासाठी शरमेची बाब आहे. आणि अशा लोकांच्या हातात देशाची अर्थव्यवस्था मोदी देत आहेत", असंही संजय राऊत म्हणाले.न्यूयॉर्कच्या ईस्टर्न डिस्ट्रिक्ट, यूएस ॲटर्नी कार्यालयाने यासंबंधी एक प्रसिद्धी पत्रक काढले आहे. यूएस अतिरिक्त सहायक ॲटर्नी जनरल लिसा एच मिलर यांनी सांगितले, "भारताच्या सरकारी अधिकाऱ्यांना दोन हजार कोटी रुपयांपेक्षा अधिकची लाच देणे, गुंतवणूकदार आणि बँकाँशी खोटे बोलणे आणि अब्जावधी रुपये त्यातून गोळा करण्याचा आरोप गौतम अदाणी आणि इतरांवर ठेवण्यात आला आहे."आम्ही २३ तारखेलाच संध्याकाळी सत्तास्थापनेचा दावा करू शकतो. महाविकास आघाडीच्या १६० ते १६५ जागा निवडून येत आहेत. हे शिंदे आणि फडणवीसांचं षडयंत्र आहे. सत्तास्थापनेइतके बहुमत मिळणार असून २३ तारखेला सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत आमचा मुख्यमंत्री कोण असणार हे सांगणार", असंही संजय राऊत म्हणाले.

### देशासाठी ही शरमेची बाब

"धारावी ते एअरपोर्टपर्यंत सर्व अदाणींना विकलं. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार, नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी निवडणुकीत २ हजार कोटींहून अधिक पैसा खर्च केलाय. हा भ्रष्टाचार आहे, ही लाच आहे.

त्यासाठीच ट्रम्प सरकारने त्यांच्याविरोधात अटक वॉरंट काढलं आहे. ही देशासाठी शरमेची बाब आहे. आणि अशा लोकांच्या हातात देशाची अर्थव्यवस्था मोदी देत आहेत", असंही संजय राऊत म्हणाले."ट्रम्प प्रशासनाने अदाणींविरोधात अटक वॉरंट काढलंय. हे देश, मोदी आणि पूर्ण भाजपासाठी शरमेची गोष्ट आहे. अदाणीमुळे या देशाला एक डाग लावलाय. म्हणून महाराष्ट्राला अदाणीराष्ट्र बनवणार नाही."

### देशाला एक डाग लावलाय

अदाणी ग्रीन एनर्जी कंपनीला कंत्राट मिळविण्याबद्दल लाच दिल्याचा आरोप ठेवला गेला. या कंपनीच्या शेअरमध्ये १९.१७ टक्क्यांची घसरण झालेली पाहायला मिळाली. अदाणी टोटल गॅस १८.१४ टक्के, अदाणी पॉवर १७.७९ टक्के आणि अदाणी पोर्ट्समध्ये १५ टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली.याशिवाय भारताच्या सरकारी अधिकाऱ्यांना दोन हजार कोटी रुपयांपेक्षा अधिकची लाच देणे, गुंतवणूकदार आणि बँकाँशी खोटे बोलणे आणि अब्जावधी रुपये त्यातून गोळा केल्याचा आरोप अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील सरकारी वकिलांनी भारतातील प्रसिद्ध उद्योगपती गौतम अदाणी यांच्यावर केला आहे.

---

# मराठा मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने?

## 10 पैकी 6 एक्झिट पोल्सनुसार महायुती जिंकून येण्याची शक्यता

। सांगली । प्रतिनिधी
।महाईन्यूज।

**यंदाची विधानसभा निवडणूक मराठा आंदोलनाभोवती केंद्रित राहिली. मनोज जरांगे पाटील आणि त्यांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष करण्याचा परिणाम महायुतीला लोकसभा निवडणुकीत दिसला. मराठा फॅक्टरमुळे लोकसभेला मोठा फटकाही बसला. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही हीच जादू दिसेल का असा प्रश्न होता.**

एक्झिट पलनुसार महायुतीला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता आहे. कारण, १० पैकी ६ एक्झिट पोल्सनुसार महायुती जिंकून येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे मराठा फॅक्टर या निवडणुकीत कितीसा प्रभावी ठरला याबाबत साशंकता आहे. असे हे दहा एक्झिट पोल आहेत. यापैकी सहा पोल्सनी महायुतीचं सरकार येईल असा अंदाज वर्तवला आहे. तर लोकशाही महारुद्रच्या पोलने राज्यात त्रिशंकू अवस्था असेल आणि अपक्ष किंवा बंडखोरांच्या हाती सत्तेच्या चाव्या असतील असा अंदाज वर्तवला आहे. प्रत्यक्षात काय होणार हे २३ तारखेला स्पष्ट होणार आहे.मराठा



आरक्षणासाठी आंदोलन करणारे नेते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली. मागच्या वर्षी जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे आरक्षणासाठी उपोषण करत असताना पोलिसांनी लाठीचार्ज केल्यानंतर जरांगे पाटील चर्चेत आले होते. विधानसभा निवडणुकीत मनोज जरांगे पाटील यांच्या सूचनेनंतर काही उमेदवारांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरले होते. परंतु, मराठा आरक्षणाचा विचार करून मतदान करा, असं आवाहन त्यांनी मराठा मतदारांना केलं होतं.

### मराठा मतदारांचा फारसा प्रभाव

त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीत मराठा मतदार मोठा प्रभाव पाडण्याची शक्यता होती. परंतु, एक्झिट पोल्सनुसार मराठा मतदारांचा फारसा प्रभाव पडलेला नसल्याचं दिसतंय. मात्र, हे चित्र २३ नोव्हेंबरलाच स्पष्ट होईल.यंदाची विधानसभा निवडणूक मराठा आंदोलनाभोवती केंद्रित राहिली. मनोज जरांगे पाटील आणि त्यांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष करण्याचा परिणाम महायुतीला लोकसभा निवडणुकीत दिसला. मराठा फॅक्टरमुळे लोकसभेला मोठा फटकाही बसला. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही हीच जादू दिसेल का असा प्रश्न होता. १० पैकी ६ एक्झिट पोल्सनुसार महायुती जिंकून येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# अदाणींच्या विरोधात अटक वॉरंट!

## लाचखोरीचा आरोप आणि अदाणींचे शेअर्स घसरले

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अदाणी समूहाचे सर्वेसर्वा आणि भारतातले प्रसिद्ध उद्योगपती गौतम अदाणी यांच्याविरोधात न्यूयॉर्कमध्ये अटक वॉरंट लागू करण्यात आलं आहे. त्यामुळे गौतम अदाणी यांच्या अडचणी वाढल्या आहेत. न्यूयॉर्कच्या न्याय विभागाच्या उप सहाय्याक ॲटर्नी जनरल लिसा एच मिलर यांनी गौतम अदाणी आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांवर भारतीय अधिकाऱ्यांना लाच दिल्याचा आरोप केला आहे. अमेरिकन गुंतवणूकदारांची फसवणूक करून भ्रष्टाचार करण्यात आला असाही ठपका त्यांनी ठेवला आहे. सोलार एनर्जीच्या प्रकल्पात करार करताना भ्रष्टाचार करण्यात आला आहे असेही त्यांनी नमूद केलं आहे.**




गौतम अदाणी यांच्याबाबतची ही बातमी सकाळी जेव्हा आली तेव्हा त्याचा परिणाम अदाणी समूहाच्या शेअर्सवर झाला. अदाणी समूहाच्या शेअर्समध्ये १० ते २० टक्क्यांची घसरण दिसून आली तर अदाणी एंटरप्रायझेसचे शेअर्सही घसरले आहेत. अदाणी पोर्ट आणि सेझ, अदाणी पॉवर आणि एनर्जी ग्रीनचे शेअर्सही घसरले.अदाणी समूहाचे सर्वेसर्वा गौतम अदाणी यांच्यावर अमेरिकेच्या विधि विभागाकडून भ्रष्टाचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यासंदर्भात अदाणींवर गुन्हादेखील दाखल करण्यात आला आहे. खुद्द गौतम अदाणी व त्यांचा पुतण्या सागर अदाणी यांच्यासह एकूण सात जणांचा यात समावेश असल्याचा हा आरोप आहे. या सगळ्यांनी मिळून सौर ऊर्जा वितरणाचं कंत्राट मिळवण्यासाठी काही सरकारी अधिकाऱ्यांना २ हजार ०२९ कोटी रूपयांची (२६५ दशलक्ष डॉलर्स) लाच देऊ केली. अदाणी व अदाणी ग्रीन एनर्जीमधील कार्यकारी अधिकारी विनीत जैन यांनी हा सगळा प्रकार कर्जदार व गुंतवणूकदारांपासून लपवून ठेवला व त्यातून ३ अब्ज डॉलरपेक्षा अधिक कर्ज व रोखे गोळा केले, असे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत. दरम्यान, अदाणी समूहाकडून जारी करण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या निवेदनात भ्रष्टाचाराच्या सर्व आरोपांचं खंडन करण्यात आलं आहे. “अमेरिकेच्या विधी विभागाकडून ‘अदाणी ग्रीन्स’च्या संचालकांवर करण्यात आलेले सर्व आरोप निराधार असून आम्ही ते सर्व आरोप फेटाळत आहोत”, असं या निवेदनात सुरुवातीलाच नमूद करण्यात आलं आहे. “अमेरिकेच्या विधी विभागानंच नमूद केल्याप्रमाणे अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये दाखल करण्यात आलेले गुन्हे तोपर्यंत फक्त आरोप ठरतात, जोपर्यंत ते सिद्ध होत नाहीत. तोपर्यंत संबंधित आरोपी हा निर्दोषच असतो. या प्रकरणात आम्ही शक्य त्या सर्व कायदेशीर बाबींचा विचार करत आहोत”, असंही या निवेदनात अदाणी समूहाकडून सांगण्यात आलं आहे.TRACT: मुंबई शेअर

### “अदाणी समूह कायद्यांना बांधील”

दरम्यान, अदाणी समूह कायद्याचं पालन करण्यासाठी बांधील असल्याचं निवेदनात म्हटलं आहे. “अदाणी समूह कायमच व्यवस्थापनाच्या सर्वोच्च तत्त्वांचं पालन करत आला आहे. त्याशिवाय, कारभारात पारदर्शकता आणि कंपनीच्या सर्वच विभागात नियमांचं पालन या बाबी अदाणी समूहासाठी महत्त्वाच्या आहेत. आम्ही आमच्या भागधारकांना, भागीदारांना आणि कर्मचाऱ्यांना हा विश्वास देऊ इच्छितो की अदाणी समूह हा एक कायद्याचं पालन करणारा समूह असून सर्व कायद्यांचा आदर राखतो”, असंही निवेदनाच्या शेवटी लिहिलं आहे.अदाणी समूहाचे सर्वेसर्वा गौतम अदाणी यांच्यावर अमेरिकेच्या विधि विभागाकडून भ्रष्टाचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. पुतण्या सागर अदाणी यांच्यासह एकूण सात जणांचा यात समावेश असल्याचा हा आरोप आहे.

बाजारात आज व्यवहारांची सुरुवातच मोठ्या आर्थिक भूकंपानं झाली. तिकडे अमेरिकेत गौतम अदाणींवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले आणि इकडे मुंबईत शेअर बाजार गडगडला. आरोप झालेली रक्कम थोडीथोडकी नसून तब्बल २ हजार कोटींपेक्षा जास्त आहे. त्यामुळे भारतात गुंतवणूकदारांचे पहिल्या तासाभरात अडीच लाख कोटींहून जास्त नुकसान झालं. त्यापाठोपाठ भारताच्या राजकीय वर्तुळात या मुद्द्यावरून प्रतिक्रिया उमटू लागल्या. विरोधी पक्षांनी अदाणींवर टीका करतानाच भारतीय जनता पक्षाला लक्ष्य केलं. राहुल गांधींनी यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जाहीररीत्या टीका केली. या प्रकरणावर आता अदाणी समूहाकडून निवेदन जारी करण्यात आलं आहे.अदाणी समूहाकडून जारी करण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या निवेदनात भ्रष्टाचाराच्या सर्व आरोपांचं खंडन करण्यात आलं आहे. अदाणी ग्रीन्स’च्या संचालकांवर करण्यात आलेले सर्व आरोप निराधार असून आम्ही ते सर्व आरोप फेटाळत आहोत”, असं या निवेदनात सुरुवातीलाच नमूद करण्यात आलं आहे.

---

# मंदिर-मशिदींमध्ये वंदे मातरम गायला हवं

## सनातन एकता पदयात्रेबाबत काय धीरेंद्र शास्त्री यांचे स्पष्टीकरण

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी एक महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. मंदिर असो की मशिद दोन्ही धर्मस्थळांमध्ये आरती, नमा यानंतर वंदे मातरम गायलं गेलं पाहिजे. यामुळे देशभक्त कोण आहेत आणि राष्ट्र विरोधी कोण? ते लक्षात येईल असं धीरेंद्र शास्त्रींनी म्हटलं आहे.**

“मंदिर असो किंवा मशिद असो, दोन्ही धर्मस्थळांवर वंदे मातरम म्हटलं गेलं पाहिजे. जर हा नियम लागू केला तर देशभक्त कोण आहे आणि राष्ट्रविरोधी कोण? ही बाब स्पष्ट होईल.” असं बागेश्वर धाम सरकार धीरेंद्र शास्त्रींनीम्हटलं आहे. या वक्तव्यावरुन वाद निर्माण होण्याची चिन्हं आहेत. मात्र हे वक्तव्य चर्चेतही आलं आहे. धीरेंद्र शास्त्रीपुढे म्हणाले, “सगळ्या समुदायांना देशात समान स्थान आहे, तसंच त्यांचा योग्य सन्मान केला जातो. मात्र वंदे मातरम म्हणण्याची प्रथा सुरु करण्यात आली की लोकांमध्ये देशभक्ती आपोआपच रुजली जाईल. तसंच कोण देशभक्त आहे आणि कोण राष्ट्रद्रोही आहे? हेदेखील समजेल. अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला तर राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने उचलण्यात



आलेलं ते पाऊल असेल. लोकांमधल्या धार्मिक बाधा दूर होतील आणि एकमेकांमध्ये बंधूभाव वाढेल असंही धीरेंद्र शास्त्री यांनी म्हटलं आहे. सनातन एकता पदयात्रेबाबत धीरेंद्र शास्त्री म्हणाले, या यात्रेचं आयोजन हिंदूंमध्ये एकता आणि एकात्म भाव निर्माण करणं हा आहे. हिंदूंनी जातीभेद विसरुन

### कोण राष्ट्रद्रोही आहे? हे समजेल

“मंदिर असो किंवा मशिद असो, दोन्ही धर्मस्थळांवर वंदे मातरम म्हटलं गेलं पाहिजे. जर हा नियम लागू केला तर देशभक्त कोण आहे आणि राष्ट्रविरोधी कोण? ही बाब स्पष्ट होईल.” असं बागेश्वर धाम सरकार धीरेंद्र शास्त्रींनीम्हटलं आहे. या वक्तव्यावरुन वाद निर्माण होण्याची चिन्हं आहेत. मात्र हे वक्तव्य चर्चेतही आलं आहे. धीरेंद्र शास्त्रीपुढे म्हणाले,मात्र वंदे मातरम म्हणण्याची प्रथा सुरु करण्यात आली की लोकांमध्ये देशभक्ती आपोआपच रुजली जाईल. तसंच कोण देशभक्त आहे आणि कोण राष्ट्रद्रोही आहे? हेदेखील समजेल.

एक झालं पाहिजे. हिंदूमध्ये हिंदू असल्याची भावना वाढली आहे आणि ही बाब चांगली आहे. सध्याचं वातावरण हे हिंदू एकतेचं आणि एकात्मतेचं आहे असंही बागेश्वर धाम सरकार धीरेंद्र शास्त्री यांनी म्हटलं आहे.धीरेंद्र शास्त्री म्हणाले आदिवासी हा शब्द मला मान्य नाही. ते अनादिवासी आहेत. या सगळ्यांना अनादिवासी म्हटलं गेलं पाहिजे असा प्रस्ताव मी ठेवतो कारण हे सगळेजण प्रभू रामचंद्रांसह उभे होते.

# डॉ. श्रीराम नेनेंशी लग्न करण्याचा निर्णय का घेतला?

१९८४ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘अबोध’ चित्रपटातून अभिनेत्री माधुरी दीक्षितने कलाविश्वात पदार्पण केलं. बॉलीवूडमध्ये आल्यावर सुरुवातीचा काही काळ तिला प्रचंड संघर्ष करावा लागला. मात्र, त्यानंतर आलेल्या ‘तेजाब’ने बॉलीवूडवर एक वेगळीच जादू केली. रातोरात माधुरी सुपरस्टार झाली. केवळ अभिनयाने नव्हे तर तिने आपल्या नृत्याने सुद्धा लाखो चाहत्यांना घायाळ केलं.‘खलनायक’, ‘हम आपके हैं कौन’, ‘दिल तो पागल है’, ‘साजन’ अशा एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपटांमध्ये ती झळकली. दमदार अभिनयासाठी फिल्मफेअर अवॉर्ड्स मिळवले. मात्र, १९९९ मध्ये करिअरच्या शिखरावर असताना माधुरीने लग्नबंधनात अडकण्याचा निर्णय घेतला. अभिनेत्रीने अचानक अमेरिकेला गेल्याने तिचे लाखो चाहते नाराज झाले होते. यानंतर देखील माधुरीने काही चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. पण, हळुहळू तिने चित्रपटसृष्टीपासून दूर राहून कुटुंबीयांवर लक्ष केंद्रीत केलं.



माधुरीने याबद्दल ‘गलाट्टा इंडिया’ला दिलेल्या मुलाखतीत भाष्य केलं आहे. “मी खूप खूश आहे कारण, भौतिक सुखापेक्षा मला माझी माणसं, माझं कुटुंब जास्त महत्त्वाचं आहे. मला अभिनय करायला आवडतो, नृत्य आवडतं... एकंदर माझ्या कामाशी संबंधित सगळ्या गोष्टी मला आवडतात. लोक मला स्टार अभिनेत्री मानतात हे माझं खरंच भाग्य आहे. पण, मला स्वत:ला याबद्दल कधीच काही वाटलं नाही. मला कधीच असं जाणवलं नाही की, अरे देवा...मी लोकांपासून आता दूर जातेय.

## सलमान खान-शिल्पा शेट्टीला उच्च न्यायालयाचा मोठा दिलासा...

मुंबई: बॉलिवूड अभिनेता सलमान खान आणि शिल्पा शेट्टीला दिलासा देणारी मोठी बातमी समोर आली आहे. या दोन्ही कलाकारांना जोधपूर उच्च न्यायालयाकडून हा दिलासा मिळाला. सलमान आणि शिल्पाविरोधात चुरू कोतवाली पोलीस ठाण्यात काही वर्षांपूर्वी एक तक्रार दाखल करण्यात आली होती. या प्रकरणावर २१ नोव्हेंबर रोजी उच्च न्यायालयात सुनावणी झाली. या तक्रार प्रकरणात जोधपूर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने शिल्पा आणि सलमान यांच्या बाजूने निकाल दिला आहे

सलमान आणि शिल्पा या कलाकारांविरोधात राजस्थानच्या चुरू पोलीस ठाण्यात एससी-एसटी कायद्यांतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला होता. गुरुवारी उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान शिल्पाच्या बाजूने वकील प्रशांत पाटील यांनी बाजू मांडली. दुसरीकडे शक्ती पांडे आणि गोपाल सांदू यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली.

सलमानचा ‘टायगर जिंदा है’ हा चित्रपट प्रदर्शित होणार होता, त्या दरम्यान हे प्रकरण घडलेले. अशी माहिती समोर आलेली की, चित्रपटाच्या एका प्रमोशनल कार्यक्रमात अभिनेत्याने अनुसूचित जातीबद्दल टिप्पणी केली होती आणि त्यांचे वक्तव्य अपमानास्पद असल्याचे म्हटले गेले. त्यानंतर लगेचच या प्रकरणी पतियाळा कोर्टात सलमान आणि इतर काही स्टार्सविरोधात एफआयआर दाखल करण्यात आलेला. चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान सलमान आणि शिल्पावर वाल्मिकी समाजासाठी जातीवाचक आणि अपमानास्पद शब्द वापरल्याचा आरोप करण्यात आला होता.



## कुणीतरी येणार येणार गं!

संकेत भोसले आणि अभिनेत्री सुगंधा मिश्रा (SUGANDHA MISHRA) हे कपल सध्या चर्चेत आहे. या जोडप्याच्या घरी लवकरच एका चिमुकल्या पाहुणाचे आगमन होणार आहे.नुकताच सुगंधाचा डोहाळे जेवणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला सुगंधा आणि संकेत यांच्या कुटुंबाने तसेच त्यांच्या जवळच्या मित्रमैत्रिणींनी हजेरी लावली. सुगंधाच्या डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. संकेत भोसले आणि सुगंधा मिश्रा यांनी सोशल मीडियावर डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाचे फोटो शेअर केले आहेत. या फोटोला त्यांनी कॅप्शन दिलं, "आमचा बेबी शॉवर कार्यक्रम हा महाराष्ट्रीयन पारंपारिक पद्धतीने (डोहाळे जेवण) पार पडला. ओटी भरण, पूजा आणि बर्फी पेडा कार्यक्रम इत्यादी गोष्टी पार पडल्या. तसेच केक कटिंग देखील करण्यात आलं, डायपर चेंजिंग सारखे मजेशीर खेळ देखील आम्ही खेळलो." पुढे त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलं, "आम्ही एका स्पेशल गाण्यावर परफॉर्म देखील केलं. आम्ही हे गाणं आमच्या बाळासाठी लिहिलं आहे. हे गाणं सुगंधाने लिहिलेले आणि संगीतबद्ध केले आहे. तसेच हे गाणं आम्ही दोघांनी गायलं आहे. ते लवकरच आम्ही तुमच्यासोबत शेअर करू" संकेत भोसले आणि सुगंधा मिश्रा यांनी शेअर केलेल्या डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाच्या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला. बेबीका धुर्वे,हेमंत थत्ते,गौहर खान, मुक्ती मोहन यांनी देखील संकेत भोसले आणि सुगंधा मिश्रा यांनी शेअर केलेल्या फोटोवर कमेंट्स केल्या.



## सारा अली खानने दाखवली केदारनाथ यात्रेची झलक!

बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खान बॉलिवूडची आघाडीची अभिनेत्री आहे. आपले सिनेमे आणि अभिनयाच्या माध्यमातून तिने प्रेक्षकांचं चांगलच मनोरंजन केलं आहे. व्यावसायिकसह वैयक्तिक आयुष्यातील सर्व अपडेट्स ती सोशल मीडियावर शेअर करत असते. साराला फिरण्याची प्रचंड आवड आहे. त्यामुळे भटकंती करतानाचे फोटो आणि व्हिडीओ ती चाहत्यांसोबत शेअर करत असते. सारा अली खान आता केदारनाथयात्रेला पोहोचली आहे. सारा अली खानने सोशल मीडियावर केदारनाथ यात्रेचा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये सारा अली खान लोकल ठिकाणी जेवण करताना दिसत आहे. दरम्यान तेथील एका साधुंचे ती आशीर्वाद घेत आहे. तसेच एका नदीकिनारी ती चेहऱ्यावर पाणी मारताना पाहायला मिळत आहे. त्यावेळी ती म्हणत आहे,"सकाळी-सकाळी थंड पाणी चेहऱ्यावर मारा बुद्धी तेज होईल". एकंदरीतच सारा अली खानचा केदारनाथ यात्रेचा व्हिडीओ चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे. साराने या व्हिडीओच्या बॅकग्राऊंडला 'केदारनाथ' सिनेमातील काफीराना गाणं लावलं आहे. सारा अली खानचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. केदारनाथ यात्रेदरम्यानचे साराचे फोटो आणि व्हिडीओ चाहत्यांच्या पसंतीस उतरले आहेत. पण हा व्हिडीओ पाहिल्यानंतर चाहत्यांना मात्र सुशांत सिंह राजपूतची आठवण आली आहे. सारा अली खानने शेअर केलेल्या व्हिडीओवर चाहते,"ईस्ट असो वा वेस्ट सारा अली खान बेस्ट आहे, व्हा दीदी सुशांत सिंह राजपूतची आठवण आली, काफीराना गाणं ऐकल्यानंतर सुशांतची आठवण आली नाही असं होत नाही, हर हर महादेव, अशा कमेंट्स करत आहेत.

# कमिन्स कसोटीत करणार विक्रम!

## विराट कोहली मोठा पराक्रम करण्याच्या उंबरठ्यावर!

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि यजमान ऑस्ट्रेलिया २२ नोव्हेंबरला पर्थमध्ये बॉर्डर गावस्कर कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात आमनेसामने येणार आहेत. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी २०२४-२५ चा पहिला सामना भारतीय वेळेनुसार सकाळी ७.५० वाजता सुरू होईल. या सामन्यात पॅट कमिन्स आणि जसप्रीत बुमराह यांच्यात नाणेफेक होताच क्रिकेटमध्ये एक अनोखा विक्रम होणार आहे. जे कसोटी क्रिकेटच्या १४७ वर्षांच्या इतिहासात पाच वेळा घडले आहे.**



वास्तविक, भारतीय संघ कर्णधार रोहित शर्माशिवाय पहिल्या कसोटी सामन्यात उतरणार आहे. रोहित शर्मा सध्या भारतात असून कुटुंबासोबत वेळ घालवत आहे. अशा स्थितीत वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह पर्थमध्ये टीम इंडियाच्या कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारणार आहे. जसप्रीत बुमराह उद्या सकाळी ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्ससोबत पर्थ कसोटीत नाणेफेकीसाठी मैदानात उतरेल, तेव्हा मैदानावर एक विलक्षण दृश्य दिसेल. या सामन्यात बुमराह आणि कमिन्स मिळून कसोटीत एक अनोखा विक्रम नोंदवतील.कसोटी क्रिकेटच्या इतिहासात वेगवान गोलंदाजांनी कसोटी सामन्यात दोन्ही संघांचे नेतृत्व केल्याचे क्वचितच घडले आहे. आता पुन्हा एकदा पर्थमधील कसोटीत घडणार आहे, जेव्हा दोन्ही संघांचे कर्णधार वेगवान गोलंदाज असतील. जसप्रीत बुमराह आणि पॅट कमिन्स हे दोघेही वेगवान गोलंदाज आहेत. कसोटी क्रिकेटच्या १४७ वर्षांच्या इतिहासात आतापर्यंत असे फक्त पाचवेळा घडले आहे, जेव्हा कसोटी सामन्यातील दोन्ही कर्णधार वेगवान गोलंदाज होते. आता कमिन्स आणि बुमराह सहावी जोडी ठरणार आहेत.आतापर्यंत जसप्रीत बुमराहने केवळ एका कसोटी सामन्यात टीम इंडियाचे नेतृत्व केले आहे, तर पॅट कमिन्सने २८ सामन्यात ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व केले आहे. २०२२ मध्ये इंग्लंडमध्ये घरच्या मैदानावर झालेल्या कसोटी सामन्यात बुमराहने टीम इंडियाचे नेतृत्व केले होते. या सामन्यात भारताला पराभवाचा सामना करावा लागला होता. त्याचबरोबर पॅट कमिन्सने २८ कसोटी सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व केले आहे. या कालावधीत ऑस्ट्रेलियाने १७ सामने जिंकले असून ६ सामने गमावले आहेत. त्याचबरोबर ५ सामने अनिर्णित राहिले आहेत.वास्तविक, भारतीय संघ कर्णधार रोहित शर्माशिवाय पहिल्या कसोटी सामन्यात उतरणार आहे. रोहित शर्मा सध्या भारतात असून कुटुंबासोबत वेळ घालवत आहे. अशा स्थितीत वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह पर्थमध्ये टीम इंडियाच्या कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारणार आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला २२ नोव्हेंबरपासून (शुक्रवार) पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवर सुरुवात होणार आहे. भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीला या मोठ्या मालिकेत अनेक विक्रम मोडण्याची संधी आहे. कोहली केवळ बॅटनेच नाही तर क्षेत्ररक्षण करतानाही अनेक मोठी कामगिरी करू शकतो. तो एक मोठा विक्रम करण्याच्या जवळ आहे, ज्यामुळे तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिला खेळाडू ठरणार आहे. ऑस्ट्रेलियाची मैदानं ही विराट कोहलीच्या आवडत्या मैदानांपैकी एक आहेत, जिथे त्याने आपल्या बॅटने खूप धावा केल्या आहेत. असा देश जिथे तो नेहमीच आपली सर्वोत्तम कामगिरी करण्यात यशस्वी ठरला आहे. यावेळी कोहलीला फलंदाजीत अनेक विक्रमांसह आपल्या वर्चस्वाची आठवण करून देण्याची संधी आहेच, पण क्षेत्ररक्षण करताना त्याला इतिहास रचण्याचीही संधी आहे. खरेतर, बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या पहिल्या कसोटीत कोहलीने चार झेल घेण्यात यश मिळवले, तर ऑस्ट्रेलियाविरुद्ध सर्व फॉरमॅटमध्ये ७० झेल (विकेटकीपर नसलेल्या) घेणारा तो इतिहासातील पहिला खेळाडू ठरेल. ३६ वर्षीय कोहली आधीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू आहे. त्याच्या आधी ही कामगिरी भारताचा माजी क्रिकेटपटू राहुल द्रविडच्या नावावर होती.जसप्रीत बुमराह उद्या सकाळी ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्ससोबत पर्थ कसोटीत नाणेफेकीसाठी मैदानात उतरेल, तेव्हा मैदानावर एक विलक्षण दृश्य दिसेल.

### कोहली पॉन्टिंगला मागे टाकणार

सध्या जागतिक क्रिकेटमधील महान फलंदाजांपैकी एक असलेला विराट कोहली ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिकेत ३५० धावा करताच मोठा विक्रम नोंदवणार आहे. तो ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉन्टिंग मागे टाकेल. ज्यामुळे तो आतंरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तिसऱ्या क्रमांकावर पोहोचेल.इतिहासातील पहिला खेळाडू ठरेल. ३६ वर्षीय कोहली आधीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू आहे. त्याच्या आधी ही कामगिरी भारताचा माजी क्रिकेटपटू राहुल द्रविडच्या नावावर होती.

---

# पडिक्कलला शुबमनच्या जागी संधी मिळणार?

## राणा आणि नितीश रेड्डी पर्थ कसोटीत पदार्पण करणार?

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि ऑस्ट्रेलिया संघांत पाच सामन्यांच्या बॉर्डर गावस्कर ट्रॉफीला २२ नोव्हेंबर म्हणजे शुक्रवारपासून पर्थ येथे सुरुवात होत आहे. या सामन्यासाठी दोन्ही संघ जोरदार तयारी करत आहेत. मात्र, या सामन्यासाठी प्लेइंग इलेव्हनची निवड करणे भारतीय संघासमोर मोठे आव्हान असणार आहे. कारण कर्णधार रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांना पर्थ कसोटीत खेळणार नाहीत. त्यामुळे भारतीय संघ युवा खेळाडूंना संधी देण्याच्या तयारीत दिसत आहे.**



पर्थ कसोटीत हर्षित राणा आणि नितीश कुमार रेड्डी भारतासाठी कसोटी पदार्पण करण्याची शक्यता निर्माण झाली आहे.नितीशचा आंध्र प्रदेशचा खेळाडू आहे . तो बॉलिंग ऑलराऊंडर आहे. शार्दूल ठाकूरने गेल्या सीरिजला जे काम केलं ते नितीशने करावं अशी अपेक्षा आहे. नितीश सनरायझर्ससाठी चांगलं खेळला. त्यांनी त्याला रिटेनही केला आहे. आयपीएल २०२४ मध्ये त्याने सनरायझर्स हैदराबादकडून तुफानी फलंदाजी करताना अनेक विक्रम मोडीत काढले होते. ज्यामुळे सनरायझर्स हैदराबाद संघाने त्याला आयपीएल २०२४ साठी सुद्धा रिटेन केले आहे. मागील दौऱ्यात शार्दूल ठाकूरने जे काम केलं होतं, ते नितीशने करावं अशी टीम इंडियाची अपेक्षा आहे. नितीशला आपली क्षमता सिद्ध करण्याची ही मोठी संधी असेल. नितीशने आपल्या कारकिर्दीत आतापर्यंत २० प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत. या कालावधीत त्याने २०.२२ च्या सरासरीने ६२७ धावा केल्या आहेत. यामध्ये एक शतक आणि दोन अर्धशतकांचा समावेश आहे. त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ५४ विकेट्सही घेतल्या आहेत.

### कोण आहे हर्षित राणा?

दिल्लीचा वेगवान गोलंदाज हर्षित राणा, ज्याला आयपीएल २०२५ च्या लिलावापूर्वी केकेआरने रिटेन केले आहे. तो आता पर्थमध्ये कसोटी पदार्पण करू शकतो. बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले की, पर्थमधील मॅच सिम्युलेशनमध्ये हर्षित खूप प्रभावी होता, विशेषत: त्याच्या बाउन्सरने सर्वांना प्रभावित केले आहे. हर्षित राणा न्यूझीलंडविरुद्ध मुंबईत पदार्पण करेल, अशी बरीच चर्चा होती पण तसं झालं नाही.